# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी कादंबरीकार: शरणकुमार लिंबाळे 'उपल्या' व 'हिंदू' संदर्भात ही प्रबंधिका सादर करताना कर्तव्यपूर्तीच्या समाधानाने मला मनस्वी आनंद होत आहे. प्रस्तुत संशोधन करताना मला ज्यांचे मौलिक मार्गदर्शन मिळाले, ज्यांनी संदर्भ साधने पुरविली, ज्यांनी संशोधनाविषयी आपुलकीने चौकशी करून प्रोत्साहन दिले व ज्यांनी माझ्यासाठी आयुष्यभर कष्ट सोसले, त्या सर्वांच्याविषयी ऋण व्यक्त करणे हे माझे परम कर्तव्य आहे.

दलित साहित्याचा व्यासंगी अभ्यास असलेले शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्राध्यापक व आदरणीय गुरुवर्य डॉ. कृष्णा किरवले सर मला मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ असल्याने त्यांनी संशोधन करत असताना वेळोवेळी मला खूप सहकार्य केले, समजावून घेतले. संशोधनाविषयी अचूक आणि मौलिक असे मार्गदर्शन केले. त्यांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे मला योग्य वाटते.

मराठी विभागातील आदरणीय विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे सर, डॉ. रविंद्र ठाकूर सर, डॉ. रणधीर शिंदे सर, हिमांशू स्मार्त सर यांचेही वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मराठी विभागातील सौ. शिगावकर, सौ. स्वामी यांचेही खूप मोलाचे सहकार्य मिळाले.

माझ्या संशोधनकार्याची सातत्याने व सहृदयतेने विचारपूस करून सदैव प्रोत्साहन देणारे व नेहमीच जीवनदायी प्रेरणा देणारे माझे भाऊ श्री. अनिल काळे, ताई लीला काळे व ज्यांनी मला इथपर्यंतच्या शिक्षणाची प्रेरणा दिली ते माझे पती श्री. विकास कांबळे यांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा मला त्यांच्या ऋणात राहणे आवडेल. माझ्या शिक्षणासाठी सदैव प्रोत्साहन देणारा माझा भाचा डॉ. अक्षय काळे याचे प्रोत्साहन मला नेहमीच प्रेरणादायी ठरले. तसेच संशोधनकार्यात मदत करणाऱ्या माझ्या मैत्रिणी मनिषा दळवी, रुपाली दळवी, कल्पना

पाटील, आशा काटकर, ज्योती माने, वनश्री सोने, वैशाली जाधव, सुनिता कांबळे, स्मिता ढावरे, उज्ज्वला पाटील यांनी मला जे सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

आजपर्यंतच्या माझ्या संशोधनाच्या कामासंबंधी मला सतत प्रोत्साहन व आशीर्वाद दिले, ते माझे पती, ताई, भाऊ, माझे सासरे कै. विठ्ठल कांबळे, माझ्या सासूबाई श्रीमती बायना कांबळे, मोठे दीर रघुनाथ कांबळे, आई श्रीमती यशोदा घोलप, पुतण्या प्रशांत, भाचे आशितोष, वैभव, राज, भाऊ सतीश, वहिणी सौ. भारती, बहिणी रेषमा, दिपाली, संस्कृती, भाऊजी श्री. नंदकुमार काळे, आबिटकर दादा, श्री. शिवाजी चव्हाण सर या सर्वांचे मिळालेले आशीर्वाद व शुभेच्छा खूप महत्वाच्या आहेत. त्यामुळे हे काम करण्यास मला प्रोत्साहन मिळाले.

याचबरोबर सर्वात महत्वाचे म्हणजे माझे पती श्री. विकास कांबळे यांची मला मिळालेली मोलाची साथ व माझ्या कामासाठी दिलेला भरपूर वेळ, मला केलेले सहकार्य याचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे मला योग्य वाटते.

प्रस्तुत संशोधनासाठी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामधील सौ. पाटील, सौ. मोहिते, मातेकर सर, सौ. माने, सौ. भांदिगरे, साठेमामा, सूर्यवंशी सर, त्याचबरोबर नाईकनवरे सर, शिंदे सर यांचीही मी आभारी आहे. त्याचबरोबर करवीर नगर वाचन मंदिरातील कर्मचारी वर्गाने केलेले सहकार्य यांचा मला माझ्या संशोधनासाठी उपयोग झाला. हे सर्व करताना श्रीकांत कॉम्प्युटर्स, कोल्हापूर यांनी माझ्या अक्षरांना मूर्त स्वरुप देऊन सुबकपणे मुद्रण करून दिल्याबद्दल तसेच ज्ञात, अज्ञात अशा सर्व व्यक्तींची मी ऋणी आहे.

**(मनिषा शंकर घोलप)**
संशोधक

# अर्पण पत्रिका

ज्यांच्या कृपाछत्राने आज ही प्रबंधिका
पूर्ण होत आहे,
ज्यांची प्रेरणा माझ्या पाठीशी सदैव आहे
ते माझे सासरे कै. विठ्ठल कांबळे,
माझे वडील कै. शंकर घोलप आणि
माझा भाचा कै. डॉ. अक्षय काळे
यांस....